Review Of Research
Vol. 3 | Issue.4 | Jan.2014
ISSN:-2249-894X
Available online at www.lbp.world

ORIGINAL ARTICLE

# बहुआयामी नेतृत्त्व - यशवंतराव चव्हाण

**प्रा. डॉ. भास्कर निफाडे**
सहयोगी प्राध्यापक, पदव्युत्तर अध्ययन व संशोधन केंद्र, रा. ब. नारायणराव बोरावके महाविद्यालय, श्रीरामपूर, जि. अहमदनगर.

स्वातंत्र्यानंतर महाराष्ट्राला तसेच देशाला फक्त कायदा व सुव्यवस्था या स्वरुपाच्या प्रशासनाची गरज नसून विकासाभिमुख प्रशासनाची गरज आहे हे ओळखणाऱ्या व्यक्तीमध्ये यशवंतराव चव्हाण अग्रगण्य होते. विकासाभिमुख प्रशासनाची गरज ओळखण्यामध्ये यशवंतरावांचे जसे द्रष्टेपण होते तसेच त्याची महाराष्ट्र राज्यात यशस्वी अंमलबजावणी करून प्रशासनाची एक वेगळीच छाप पाडून त्याचा आदर्श वस्तुपाठ त्यांनी देशपातळीवर देखील दाखवून दिला. 'सामान्य माणूस' हा त्यांच्या राजकीय, सामाजिक व आर्थिक नीतीचा केंद्रबिंदू होता. त्या दृष्टीनेच त्यांनी प्रशासनातील नवी लोकशाही व्यवस्था निर्माण केली.

"प्रशासनातील लोकशाही म्हणजे एकमेकांच्या सतत विचारविनिमयाने चालणारा राज्य कारभार होय. कोणत्याही प्रकारचा साचेबंद दृष्टीकोण न ठेवता लोकांचे प्रतिनिधी एकत्र येवून जेथे विचारविनिमय करतात अशा शासनाच्या पध्दतीला मी लोकशाही म्हणतो." अशी लोकशाहीची स्वतःची अशी अनौपचारिक व्याख्या यशवंतरावांनी केली आणि ती ते तंतोतंत जगलेही. कोणत्याही प्रकारचं साचेबंध स्वरुप स्वतःच्या नेतृत्त्वाला व वैयक्तिक आयुष्याला त्यांनी येऊ दिलं नाही. शेवटपर्यंत कोणत्याही पदाचे मानकरी असले तरी केवळ लोकांचे प्रतिनिधी म्हणून ते वावरले व जगलेही.

लोकनेता कसा असावा? याचे यशवंतरावांसारखे दुसरे उदाहरण क्वचितच आढळेल.

यशवंतरावांचे कर्तृत्त्व चौफेर स्वरुपाचे होते. आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार, लोकनेता, समतोल राजकारणी कुशल मुत्सद्दी, व्यवहार चतुर प्रशासक, अफाट लोकसंग्राहक, साहित्यिक, उत्तम वक्ता, कला रसिक, तत्त्वचिंतक, कुटुंबवत्सल अशी विविध विशेषण त्यांच परिपूर्ण व्यक्तिमत्त्व साकारण्यासाठी अपुरी आहेत असेच म्हणावे लागेल.

महाराष्ट्राची आजची प्रगती आणि त्याचबरोबर महाराष्ट्राचे पुरोगामीत्त्व हे यशवंतरावांच्या विचाराआधारे प्रगल्भ झाले आहे हे विसरता येणार नाही. शिक्षण, सहकार, विज्ञान, तंत्रज्ञान, कला, साहित्य अशा जीवनाच्या विविध क्षेत्रावर त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची, विचारांची छाप आजही पडलेली दिसते.

## लोकशाहीचा मूलभूत विचार :-

राज्यशास्त्र आणि प्रशासन या दोन्ही विषयांच्या स्व. यशवंतराव यांचा गाढा व्यासंग होता. ते स्वतःला राज्यशास्त्राचे विद्यार्थी समजायचे. वेगवेगळ्या शासनप्रणालींचा त्यांनी सखोल अभ्यास केलेला होता. 'राज्यशास्त्र हे सामाजिकशास्त्र असल्याने ते परिवर्तनीय आहे असे त्यांचे मत होते. आपण जेव्हा एखाद्या सामाजिक शास्त्राचा विचार करु लागतो तेव्हा आपण बदलत्या जगात रहात आहोत व सामाजिक जीवन परिवर्तनशील आहे हे सत्य आपल्याला लक्षात घ्यावे लागते." असा त्यांचा विचार यामागे होता. लोकशाहीवर विशेषतः भारताने स्वीकारलेल्या संसदीय लोकशाही

प्रणालीवर त्यांची नितांत श्रध्दा आणि निष्ठा होती. प्रसासनाबद्दल त्यांनी अगदी मूलभूत विचार केला होता. प्रशासन म्हणजे राज्यकारभार. मात्र ती शासनाची एक बाजू आहे. शासनाची दुसरी बाजू राजकीय आहे. या दोन्ही बाजूंचा सुरेख समन्वय साधला तरच त्याचे पर्यवसान लोकांच्या समाधानात होईल असे त्यांचे साधे व सोपे सुत्र होते. लोकशाहीला सामाजिक आणि आर्थिक लोकशाहीची जोड असणे आवश्यक आहे. अशी जोड ज्यावेळी मिळेल, तिथेच तिला खऱ्या लोकशाहीचे स्वरुप प्राप्त होईल अशी त्यांची भूमिका होती.

लोकशाही हा आपल्या देशाच्या शासनप्रणालीचा प्राण आहे. लोकशाहीत लोक किंवा जनता ही सार्वभौम असते. लोकशाहीत प्रत्येक कृती ही लोककेंद्रीत आणि लोककल्याणाची असावी लागते. यासाठी अर्थातच विचारविनिमय आणि सहमती असणेही खूप महत्त्वाचे असते. अशी त्यांची ठाम धारणा होती.

**शिक्षणविषयक विचार :-**

विकासाची कास धरून देशाचा व राज्याचा विकास साधायचा असेल तर शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही, ते त्यांनी जाणले होते. त्यामुळे शिक्षण हे सर्वसामान्य तळागाळातील व्यक्तींपर्यंत जोपर्यंत पोहोचत नाही, तोपर्यंत विकासाची गती व मार्ग स्पष्ट होणार आहे. म्हणून ते म्हणतात, ‘‘हिमालयातील गंगा जेव्हा भगीरथी होऊन या भूतलावर अवतरते तेव्हाच ती लोकोपयोगी ठरते. त्याचप्रमाणे ज्ञानाची गंगा समाजाच्या खोलपर्यंत पोहोचली पाहिजे, म्हणजेच ती समाजाला कल्याणकारक होईल.

शिक्षणाविषयीच्या अपेक्षा व्यक्त करताना ते म्हणतात, ‘‘शिक्षणाने एक प्रकारचे मानसिक व बौध्दिक सामर्थ्य निर्माण झाले पाहिजे, एवढेच नव्हे तर या बौध्दिक व मानसिक सामर्थ्यांच्या जोरावर आपल्या जीवनाचा यशस्वी मार्ग आपण शोधून काढीत असताना समाजाने आपल्या कल्याणकारी या ज्ञानगंगा उघडल्या, त्या समाजाचेही थोडेफार ऋण फेडण्याची शक्ती व भावना या शिक्षणाने आपल्यात निर्माण केली पाहिजे.’’

देशातील लेखक, विचारवंत, शास्त्रज्ञ आणि संशोधक यांच्या प्रयत्नाने निर्माण होणारे जे विचारधन आहे ते खरे म्हणजे समाजाचे फार मोठे धन आहे असे ते मानीत. ‘‘हे धन असले म्हणजे देश ओळखला जातो. समाजाचे जीवन प्रवाही राहते. समाज जीवंत राहतो. तो त्याच्याजवळ असणाऱ्या भौतिक सामर्थ्याने नाही तर त्याच्याजवळ असणाऱ्या सांस्कृतिक मूल्यांवर व विचारधनावर’’ अशा प्रकारची त्यांची शिक्षणाबाबतची विचारधारा होती.

शिक्षणाकडे ते मानसिक व आर्थिक विकासाचे मुलभूत साधन म्हणून पाहात असत. महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, बडोद्याचे सयाजीराव गायकवाड, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील यांचा शैक्षणिक वारसा महाराष्ट्राला लाभला होता. या महान व्यक्तींनी दाखवलेल्या मार्गाने यशवंतरावांनी गतीने वाटचाल केली. लोकशाही शासन व लोकशाही समाजनिर्मितीसाठी शिक्षण किती किती महत्त्वाचे आहे हे त्यांनी जाणले होते. विशेषतः पिढ्यान्‌पिढ्या ग्रामीण भागातील तळागाळातील समाज शिक्षणापासून वंचित राहिला होता. शिक्षणाची ही गंगा समाजातल्या खालच्या थरापर्यंत पोहोचावी यावर प्राधान्याने भर देण्याचा निर्णय घेऊन त्या दिशेने पावले टाकली. या कामी रयत शिक्षण संस्था, शिवाजी शिक्षण संस्था, स्वयंसेवी छोट्या शिक्षण संस्था या सर्वांना त्यांनी सहभागी करून घेतले. प्राथमिक शिक्षणाबरोबरच माध्यमिक व उच्चशिक्षणाकडेही यशवंतरावांनी जाणीवपूर्वक लक्ष दिले. माध्यमिक शाळा व महाविद्यालये चालविणाऱ्या स्वयंसेवी संस्थांना अनुदान देण्याचे उदार धोरण स्वीकारले. फी सवलती व शिष्यवृत्ती, आर्थिकदृष्ट्या मागास मुलांना इ.बी.सी. सवलतीची योजना १९५९ साली लागू केली. त्यांचा हा निर्णय अत्यंत ऐतिहासिक व दूरदर्शीपणाचा ठरला. कारण पुढील दोन दशकात ग्रामीण भागात प्राथमिक व उच्चशिक्षण देणाऱ्या शाळा महाविद्यालयांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली. त्यांच्याच काळात मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद व शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर या विद्यापीठांची स्थापना झाली. शैक्षणिक क्षेत्रात मोलाचे काम करणाऱ्या रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष म्हणून त्यांनी महत्त्वाचे योगदान दिले. पदवी घेऊन पार पडलेल्या बहुजन समाजातील पहिल्या पिढीचा उच्चशिक्षित युवकवर्ग यशवंतरावांनी भारावून टाकला आणि राष्ट्र व समाजसेवेसाठी प्रेरित केला.

**प्रतिभावंत प्रशासक :-**

मुख्यमंत्री म्हणून चव्हाण हे कुशल व प्रतिभावान प्रशासक होते. त्यांच्या वेळच्या मराठी व अन्य राज्यातील कित्येक उच्च प्रशासकीय अधिकारी तसेच विरोधी पक्षातील नेते अजूनही त्यांच्या या कौशल्याबद्दल गहिवरून बोलतात.

संरक्षण व गृह खात्याचे मंत्री असतानाही उत्तम प्रशासक म्हणून त्यांची प्रतिमा तळपत होती. कृष्ण मेनन यांनी राजीनामा दिल्यानंतर दिल्लीच्या राजकारणाचा दीर्घ अनुभव असलेले कितीतरी मुरब्बी नेते त्या पदासाठी आसुरलेले असताना त्यांना बाजूला सारून नेहरूंनी कराडच्या या शेतकऱ्याच्या पोराला उचलून त्या पदावर नेले ते उगाचच नव्हे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून त्यांची प्रशासकीय किर्ती सर्व दूरवर पसरली होती. द्वैभाषिकाचे मुख्यमंत्री असतानाच गुलामी पध्दतीची महारवतनी पध्दती नष्ट करणारा कायदा त्यांनी १९५८ मध्ये मंजूर करून घेतला. घटनेद्वारे अस्पृश्यांना मिळणाऱ्या सोयी-सवलती धर्मांतर केलेल्या नवबौध्दांना उपलबध नव्हत्या. धर्म बदलला तरी त्यांची सामाजिक व आर्थिक परिस्थिती यत्किंचितही बदलली नव्हती. सामाजिक न्यायातील हे न्यून त्यांनी मुख्यमंत्री पदावर येताच एका हुकूमाद्वारे दूर करून नवबौध्दांना या सर्व सवलती मिळवून दिल्या. दुसऱ्या कोणत्याही राज्याने हे पाऊल उचलले नव्हते.

शेती, उद्योग, अर्थव्यवस्था, सिंचन, शिक्षा, साहित्य, भाषा व संस्कृती आदी समाज जीवनाच्या सर्व क्षेत्रातील परिस्थितीचा आणि प्रश्नांचा चव्हाणसाहेबांचा सखोल अभ्यास होता व त्यावर त्यांनी स्वतःच्या पुरोगामी विचारधारेतून चिंतन केले होते. त्याच दिशेने त्यांनी धोरणे आखली, निर्णय घेतले आणि गतीने अंमलबजावणी सुरू केली. प्रशासकीय अधिकाऱ्याचा योग्य तो मान ठेवून त्यांच्याशी मनमोकळी सल्लासमलत करून व त्यांना बरोबर घेऊनच निर्णय घेणे अशी त्यांची शैली होती. संपूर्ण प्रशासनामध्ये त्यांनी आपल्या या समजूतदार कार्यशैलीमुळे नवा जोम व चांगले काम करण्याची इच्छा शक्ती निर्माण केली. राज्यातील प्रत्येक समाजसमुहाला, प्रदेशाला, छोट्या दुर्लक्षित गटांना यथायोग्य न्याय मिळाला पाहिजे हे सूत्र त्यांनी प्रशासनात रुजविले आणि त्यानुसार कार्यपध्दती घालून दिली. त्यामुळेच त्यांच्या कल्याणकारी निर्णयांची प्रशासनाकडून त्वरेने अंमलबजावणी झाली. संकल्पनांचा ठोस व यथायोग्य अविष्कार, धोरण, योजना, निर्णय यांची अंमलबजावणी यशवंतरावांनी ज्या पध्दतीने व निष्ठेने केली, तसा प्रयत्न इतर राज्यातून क्वचितच झाला असेल.

**संयुक्त महाराष्ट्राचे शिल्पकार :-**

संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती हा यशवंतरावांच्या राजकीय कर्तृत्त्वाचा कळसाध्याय होता. संयुक्त महाराष्ट्राची जोरदार चळवळ महाराष्ट्रात सुरु होती. त्याच दरम्यान राज्यपुनर्रचना मंडळाचा अहवाला जाहीर झाला. या अहवालात समतोल द्वैभाषिक राज्याची कल्पना मांडण्यात आली होती. या संकल्पनेला यशवंतरावांनी कठोरपणे विरोध केला. परंतु पक्षाची भूमिका म्हणून आणि शिस्तपालन म्हणून द्वैभाषिक राबविण्याची जबाबदरी त्यांनी शेवटी स्वीकारली. काँग्रेस पक्षाशी असलेल्या निष्ठेमुळेच त्यांनी हा निर्णय स्विकारला होता. यशवंतरावांचे नेतृत्त्व आणि व्यक्तित्त्व राष्ट्रीय दर्जाचे होते हेच यामुळे सिध्द झाले.

त्रिराज्य योजना, केंद्रशासीत मुंबई, विशाल द्वैभाषिक असे अनेक पर्याय पुढे आले. तेव्हा त्यांनी लोकभावना आणि सर्वसामान्य लोकशाहीतील मागणी म्हणून मनापासून संयुक्त महाराष्ट्राला पाठिंबाच दिला. मात्र पक्ष नेतृत्त्वाकडून आदेश मिळाल्यावर एकभाषिक राज्याबाबतचे आपले अनुकूल मत त्यांनी निर्भिडपणे आणि सुस्पष्टपणे मांडले आणि मगच द्वैभाषिक राबविण्यास संमती दिली. या बाबत त्यांनी अत्यंत प्रांजलपणे आपले मत नोंदवून ठेवलेले आहे.

यशवंतराव आपल्या कर्तव्याशी एकनिष्ठ होते. ते म्हणतात, ‘‘मनात एकभाषिक ठेवून मी द्वैभाषिक चालविले नाही. या प्रयोगाला पुर्ण वाव द्यायचा तो यशस्वी होत असेल तर त्याला संधी द्यायची अशा निर्धाराने व निश्चयाने मी एकदिडवर्ष द्वैभाषिक राबविले. राष्ट्रीयदृष्ट्या एक प्रयोग होत आहे. त्याला आपल्याकडून संपूर्ण सहकार्य द्यावयाचे अशी माझी याबाबत धारणा होती. त्यांच्या राजकीय समारात्मक दृष्टीकोनाचे हे अत्यंत उत्तम उदाहरण म्हणता येईल.

द्वैभाषिकाचे मुख्यमंत्री म्हणून सुमारे दिडवर्ष काम केल्यावर एकदा पंडितजी मुंबईच्या दौऱ्यावर आले असता या प्रयोगाबाबत दोघांची चर्चा झाली होती. त्यावेळी ‘‘शासकीयदृष्ट्या द्वैभाषिक मुंबई राज्य चांगले चाललेले असले तरी लोकभावना मात्र त्याला अजिबात अनुकूल नाही आणि राजकीयदृष्ट्या हा प्रयोग योग्य ठरणार नाही’’ हे आपले मत त्यांनी निर्भिडपणे पंडितजीसमोर मांडले होते. त्यानंतर मात्र पंडितली संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीला अनुकूल झाले आणि अखेर. १ मे १९६० रोजी पंडितजीसह यशवंतराव संयुक्त महाराष्ट्राचा मंगल कलश घेऊनच महाराष्ट्रात परतले.

**समन्वयी राजकारणाचे द्रष्टेपण :-**

महाराष्ट्र राज्याच्या राजकारणात व समाजकारणात यशवंतरावांची ही वैचारिक बैठक अतिशय उपयुक्त ठरली. सत्ता मिळविण्यासाठी लोकशाहीत संख्याबळ महत्त्वाचे ठरते, त्यासाठी पक्ष संघटना मजबूत असावी लागते. माणसे हेरुन ती

जोडण्याची, त्यांना कामाला लावण्याची व एकत्र ठेवण्याची व त्यांची जवळीक वाढविण्याची यशवंतरावांची क्षमता अजोड होती. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीमुळे काँग्रेस पक्षाला खूप हादरे बसले होते. स्वातंत्र्यानंतरच्या दशकात शहरी पांढरपेशा नेतृत्त्वाचा राजकारणात वरचष्मा होता. सत्यशोधक चळवळीच्य प्रभावामुळे बहुजन समाजातील मोठ्या संख्येने नेते मंडळी पक्षाबाहेर पडून त्यांनी शेतकरी कामगार पक्षाची स्थापना केली होती. ग्रामीण भागातील बहुजन समाजातील नेतृत्त्व डाव्या विचारसरणीकडे झुकले होते. यशवंतरावांनी पक्षांतर्गत विरोध तडजोडीच्या मार्गाने बेरजेच्या राजकीय कुशलतेने दूर ठेवला व त्याच कुशलतेने समाजवादी समाजरचनेच्या तत्त्वांशी निष्ठा असलेल्या यशवंतराव मोहिते, अण्णासाहेब शिंदे, शंकरराव मोरे, र. के. खाडीलकर व अशा अनेक नेत्यांना व त्यांच्या सहकाऱ्यांना काँग्रेसमध्ये आणले. चव्हाणसाहेब राष्ट्रीय व्यापक पुरोगामी आणि तात्त्विक परिभाषा वापरुन विरोधकांना आपलेसे करीत असत. त्यांनी अशा प्रकारे बेरजेचे राजकारण केले. शहरी विरुध्द ग्रामीण, पांढरपेशे विरुध्द ग्रामीण बहुजन समाजाचे नेतृत्त्व, असा वाद त्यांनी होऊ दिला नाही. बहुजन समाजासाठी प्रतिष्ठित व आर्थिकदृष्ट्या संपन्न लोकांपेक्षा सामान्यातून वेगवेगळ्या जाती जमातीमधील नेतृत्त्व पुढे आणली. यामध्ये जुन्या पिढीतील वसंतदादा पाटील, गोपाळराव खेडकर, वसंतराव नाईक, कन्नमवार, डॉ. रफिक झकेरिया, विनायकराव पाटील यांच्या पासून शरदराव पवारापर्यंतच्या नव्या पिढीचा समावेश होतो.

१९६२ साली सत्तेच्या विकेंद्रीकरणाचा भाग म्हणून 'पंचायत राज्य' शासन पध्दतीचा स्वीकार करुन जिल्हा परिषदा, पंचायत समित्या व ग्रामपंचायतीकडे स्थानिक स्वराज्याचे अधिकार दिले. यामधून बहुजन समाजातले ग्रामीण नेतृत्त्व उदयाला आले. जिल्हा परिषदा, पंचायत समित्या व ग्रामपंचायतीमधून यशस्वीपणे काम केलेले तरुण नेतृत्त्व पुढे राज्य स्तरावर व देशपातळीवर यशस्वीपणे काम करु शकले. स्थानिक स्वराज्य संस्था या खऱ्या नेतृत्त्वाच्या प्रयोगशाळाच ठरल्या. त्यामुळेच यशवंतरावांचे राजकीय व सामाजिक क्षेत्रातील हे कार्य लोकोत्तर ठरले.

**रसिक राजकारणी :-**

शब्दांच्या सामर्थ्यावर विश्वास ठेवणारे यशवंतराव हे राजकारण आणि साहित्य यांचा समन्वय साधणारे दुर्मिळ नेते होते. 'राजकारण आणि साहित्य' दोघांचेही माध्यम शब्द आहेत. "राजकारणी हे साहित्यिकांचे शब्द बंधू असतात" असे ते म्हणत. 'कृष्णाकाठ' आणि 'ऋणानुबंध' ही त्यांची आत्मचरित्रे आजही रसिकांचे आकर्षण आहेत. विचारवंत, राजकीय नेता, असामान्य साहित्यिक आणि शब्दाचा भोक्ता असे यशवंतरावांचे व्यक्तिमत्त्व होते.

साहित्य आणि साहित्य संमेलने ही त्यांच्या मर्मबंधातली ठेव होती. अतिशय व्यस्त अशा दिनक्रमातूनही ते संधी मिळेल तेंव्हा साहित्यिक उपक्रम, नाटके, संगीताच्या मैफिली यांना हजेरी लावायचे मात्र अशा ठिकाणी जाताना किंवा तेथे वावरताना त्यांनी आपल्या साहित्यगुणांचा टेंभा कधीही मिरवला नाही. एक रसिक म्हणून ते अशा कार्यक्रमांचा आनंद लुटायचे, मराठी भाषा तिच्यातील साहित्य, साहित्यिक यांच्याबद्दल त्यांच्या मनात एक प्रकारचा अकृत्रिम जिव्हाळा होता. प्रत्येक साहित्यप्रेमी हा आजच्या लोकशाही युगात एक नम्र समीक्षक असतो यावर त्यांचा ठाम विश्वास होता. साहित्य, कला, क्रीडा, संगीत, नाट्य या सर्वच क्षेत्रात त्यांनी रस घेतला त्याकडे समग्रतेने पाहिले. शब्दांच्या सौंदर्यावर व सामर्थ्यावर त्यांचा नितांत विश्वास होता. कल्पना, विचार व शब्द यांचा त्रिवेणी संगम त्यांच्या ठिकाणी झालेला होता. सुसंस्कृत मनाला चिंतनशील वृत्तीची जोड मिळाल्यामुळे मनाचा ठाव घेणाऱ्या मृदू, संयमी, निश्चयी वाणीमुळे त्यांचे वक्तृत्व शैलीदार बनले. याचा प्रत्यय त्यांच्या 'सह्याद्रीचे वारे' मधील संग्रहातून येतो. साध्या, सरळ बोलीभाषेत ते आपले विचार श्रोत्यांपर्यंत पोहचवीत असत. आपल्या अमोघ वक्तृत्वाच्या माध्यमातून लोकशिक्षकाची भूमिका ते प्रभावीपणे वाढवित असत. साहित्य, संगीत, नाटक, कला या क्षेत्रातील त्यांची रसिकता तसेच त्यांच्या वाचनाची व व्यासंगाची प्रचिती आल्यावर नागरी संस्कृतीतील वरील क्षेत्रातील बुध्दीजीवी वर्ग त्यांच्याकडे आकृष्ट झाला. परिणामी साहित्यिक, कलावंत, प्राध्यापक, वकील, पत्रकार, विचारवंत यामध्ये ते लोकप्रिय झाले. या सर्व क्षेत्रांना त्यांनी उत्तेजन व सहाय्य देण्याचे कार्य केले. महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ भाषा संचालनालय, लोकसाहित्य समिती, विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ अशा विभागांची स्थापना करुन त्या माध्यमातून साहित्य व सांस्कृतिक उपक्रमांना उत्तेजन दिले. अशा प्रकारे सुसंस्कृत मन, चिंतनशील वृत्ती, ज्ञानलालसा, गुणी जनांना मदत करणारा रसिक गुणग्राहक नेता, जीवनातील चढ उतार, सुखदुःखे, टिका-निंदा व स्तुती समबुध्दीने पचविणारा हा स्थितप्रज्ञ जाणता राज्यकर्ता होता. यशवंतरावांची गांधी-नेहरु व काँग्रेसवर निष्ठा होती. या निष्ठेचे त्यांनी राजकीय व सामाजिक जीवनात सदैव उच्च नैतिक मूल्यांचे जतन केले. पंडित नेहरु यांच्या नंतरच्या वैचारिक अधिष्ठान लाभलेल्या फार थोड्या नेत्यांमध्ये यशवंतराव चव्हाण यांचा समावेश होतो. 'राजकारण हा सत्तास्पर्धेचा आखाडा

करणे हे या दरिद्री असलेल्या देशात महापातक आहे.' हा मौलिक विचार यशवंतरावांनी व्यक्त केला होता. त्याचबरोबर "राज्ये जी चालतात ती राज्य चालविणाऱ्यापेक्षा राज्य शक्तीच्या बाहेर जी माणसे असतात त्यांच्या पुण्याईने चालतात ती माणसे ज्या परंपरा ज्या शक्ती निर्माण करतात त्यांच्या साहाय्याने ती चालतात" या विचारातच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे दर्शन आपल्याला होऊ शकते. यशवंतराव चव्हाण हे आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार होते. संपूर्ण महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातून माणिक मोती वर आणावेत तसे हजारो कार्यकर्ते साहेबांनी वर आणले. त्यांना कार्याची संधी दिली. त्यांचे नेतृत्त्व विकसित करुन महाराष्ट्राचा कायापालट केला.

"समाजाच्या शिक्षणाची दिशा त्यांना स्पष्टपणे माहिती होती. ज्ञानाचे आकर्षण व समाजातील दुबळ्यांची सेवा करण्याची विचारधाराही त्यांनी मनापासून जोपासली. राजकारणातले ते एक अभ्यासू व सुसंस्कृत व्यक्तिमत्त्व होते. आणि म्हणूनच त्यांच्या विषयीचा आदर आजही वृध्दींगत होताना दिसत आहे. मात्र, अखेरच्या दिवसात बदकाच्या कळपात राजहंस सापडावा तसे त्यांचे झाले ते शापित यक्ष ठरले."

"सुसंस्कृत नेतृत्वाचा आदर्श वस्तुपाठ ठरलेल्या यशवंतरावांनी आपल्या संस्काराची जी शिदोरी महाराष्ट्राला दिली ती पुढील प्रवासात दिर्घकाळ आपल्याला संजीवनी देत राहणार आहे. महाराष्ट्रालाच नव्हे तर देशाला दिशा दाखवत राहणार आहे."

**संदर्भ :-**

१. लोकराज्य, महाराष्ट्र शासन प्रकाशन.
२. युग प्रवर्तक यशवंतराव, संपादन रामनाथ वाघ, प्राचार्य शितोळे, महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, पुणे, प्रथमावृत्ती.
३. भावलेली माणसं - ले. ॲड्. रावसाहेब शिंदे, अमेय प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, २००७.